

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटुसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक १०७ वा | बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: – SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

भोंदू मनोहर भोसले प्रकरणाला नवे वळण...

राणा सूर्यवंशीच मुख्य आरोपी व सुत्रधार...!

उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्याची सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांची मागणी



पुणे (कटूसत्य वृत्त) :- भोंदूगिरीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांची दिशाभूल करून फसवणूक करत असल्याने जेलमध्ये गेलेला मनोहर मामा भोसले प्रकरणाला आता नवे वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकरणात राणा सूर्यवंशी यालाही आरोपी करण्यात यावे, तसेच खटल्याची प्रभावी आणि निष्पक्ष बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ सरकारी वकील उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात यावी, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केली आहे. पुणे येथे आयोजित पत्रकार परिषदेनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी ही मागणी केली.

मनोहर मामा भोसले प्रकरणातील तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित करत तृप्ती देसाई यांनी या प्रकरणाची व्याप्ती आणि त्यातील संबंधित व्यक्तींच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता व्यक्त केली. केवळ मुख्य आरोपीपुरतीच तपासाची व्याप्ती मर्यादित न ठेवता, या प्रकरणाशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीची भूमिका तपासली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

मोठं मोठ्या राजकीय लोकांचा वरदहस्त आहे म्हणून सांगणार्या राणा सूर्यवंशी याची चौकशी करण्याची मागणी आता पुढे येत आहे. या प्रकरणात राणा सूर्यवंशी याचा नेमका काय संबंध आहे, त्याची भूमिका काय होती आणि त्याच्याविरोधात काही ठोस पुरावे आहेत का, याची पोलिसांनी सखोल चौकशी करावी, अशी मागणी देसाई यांनी केली. सोलापूर पोलीसांनी योग्य तपास करून सदर गुन्ह्यात राणा सुर्यवंशी याचा सहभाग असल्यास त्यालाही आरोपी करून अटक करण्यात यावी, अशी त्यांची भूमिका आहे. नाही तर राणा याची मोठ्या राजकीय लोकांमध्ये उठबस असल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल होत नाही का असा आरोप गृह खात्यावर केला जाईल अशी ही चर्चा सुरू झाली आहे.

न्यायासाठी उज्ज्वल निकम हवेत, मग खरात प्रकरणात का नाही ?

मनोहर मामा भोसले प्रकरणात आर्थिक गुन्ह्यांचा मुद्दा पुढे करून उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्याची मागणी केली जाते. मग खरात प्रकरणातही गंभीर आरोप आणि पुरावे समोर येत असताना अशाच सक्षम सरकारी वकिलांच्या नियुक्तीची मागणी का होत नाही?

न्यायाच्या मागणीमध्येही प्रकरणानुसार वेगवेगळे निकष असावेत का? गुन्हा कोणाचाही असो, आरोपी कितीही प्रभावशाली असो, न्यायालयात सरकारची बाजू भक्कमपणे मांडली गेली पाहिजे. मग हा आग्रह सर्वच गंभीर प्रकरणांमध्ये समान असायला नको का? न्यायाला राजकीय सोयीची चौकट नसावी, हाच खरा प्रश्न!

उज्ज्वल निकम यांची नियुक्ती का आवश्यक?

मनोहर मामा भोसले प्रकरणातील खटल्यात पीडितांना न्याय मिळण्यासाठी सक्षम आणि अनुभवी सरकारी वकिलांची आवश्यकता असल्याचे तृप्ती देसाई यांनी सांगितले. त्यामुळे ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करावी, अशी मागणी त्यांनी राज्य सरकारकडे केली. या प्रकरणातील कायदेशीर बाजू प्रभावीपणे मांडली गेली पाहिजे आणि कोणत्याही दबावाशिवाय न्यायालयीन प्रक्रिया पार पडली पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

भोंदूगिरीच्या प्रकरणांमध्ये कठोर कारवाईची गरज

समाजातील अंधश्रद्धा, धार्मिक भावना आणि श्रद्धेचा गैरफायदा घेऊन नागरिकांची फसवणूक करणाऱ्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी अशा प्रकरणांमध्ये कठोर कायदेशीर कारवाई होणे गरजेचे आहे. श्रद्धेच्या नावाखाली सर्वसामान्यांची आर्थिक किंवा मानसिक फसवणूक होत असेल, तर संबंधितांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे, असा मुद्दाही या पत्रकार परिषदेतून पुढे आला.

राणा सुर्यवंशी याच्या फार्म हाऊसवरचे व्हिडिओ रेकॉर्डिंग व्हायरल होणार... ?

राणा सुर्यवंशी याचे फार्म हाऊस इंदापूर तालुक्यातील कलठन या गावात आहे. त्या फार्म हाऊसवर रात्रीचे अनेक खेळ मोठं मोठ्या राजकीय व्यक्तींच्या व मोठं मोठ्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत चालत होते. त्यावेळी काहीजणांनी व्हिडिओ रेकॉर्डिंग करून घेतलेले आहेत. ते व्हिडिओ लवकरच व्हायरल होणार असल्याचे किंवा न्यायालयासमोर दाखवले जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.





झोळ कुटुंबियांचीच केंद्रीय यंत्रणेकडून निःपक्ष चौकशीची मागणी...!

दत्तकला शिक्षण संस्था बळकावण्यासाठी राणा सूर्यवंशी एका पोलीस अधिकाऱ्याच्या सहकार्याने झोळ कुटुंबियांना खोट्या केसेसमध्ये गुंतवण त्रास देत असल्याने झोळ कुटुंबियांनीच राणा सुर्यवंशी याने स्वतः घडवून आणलेला बारामतीतील बनावट हल्ला व भोंदू मनोहर भोसले या प्रकरणांची एकत्रितपणे केंद्रीय यंत्रणेकडून निःपक्ष चौकशीची मागणी केली होती व आहे.

भाजप नेते रामदास झोळ आणि माया झोळ यांची बाजू समोर येणे जितके आवश्यक आहे, तितकेच पोलिसांनी तपासात मांडलेले आरोप हे राणा सूर्यवंशी यांच्याच सांगण्यावरून मांडलेत का? याची चौकशी होणेही महत्त्वाचे आहे. संबंधित कर्मचाऱ्यांचे जबाब, बँक व्यवहारांची नोंद, संस्थेच्या व्यवस्थापनाचे दस्तऐवज आणि अधिकृत तपास अहवाल यांतूनच या प्रकरणातील सत्य स्पष्ट होऊ शकते. संस्थेच्या नियंत्रणासाठी कोणताही बेकायदेशीर प्रयत्न झाला असेल, तर त्याची चौकशी झाली पाहिजे; आर्थिक गैरव्यवहार झाला असल्यास त्याचे पुरावे समोर आले पाहिजेत; आणि कोणावर खोटे गुन्हे दाखल करून अन्याय झाला असल्यास त्यालाही न्याय मिळाला पाहिजे. आरोपांच्या राजकारणापेक्षा निष्पक्ष तपास, पारदर्शकता आणि कायद्याची समान अंमलबजावणी यांनाच या प्रकरणात प्राधान्य मिळणे आवश्यक आहे.

आता सरकारच्या भूमिकेकडे लक्ष

तृप्ती देसाई यांनी केलेल्या या मागण्यांमुळे मनोहर मामा भोसले प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे. राणा सूर्यवंशी याच्या कथित भूमिकेची चौकशी करण्याबाबत पोलीस प्रशासन काय निर्णय घेते, तसेच उज्ज्वल निकम यांच्या नियुक्तीच्या मागणीवर राज्य सरकार काय भूमिका घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणात केवळ आरोप-प्रत्यारोप न होता सत्य बाहेर यावे, तपास पारदर्शक व्हावा आणि दोषी आढळणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर कायद्यानुसार कारवाई व्हावी, हीच या मागणीमागील प्रमुख अपेक्षा आहे.

भाजप नेते रामदास झोळ व त्यांच्या कुटुंबीयांचा भोंदू मनोहर भोसले याच्याशी दुरान्वयानेही संबंध नाही..

दत्तकला शिक्षण समूहाचा आणि रामदास झोळ व माया झोळ यांचा भोंदूगिरी करणारा हरामखोर मनोहर ऊर्फ मामा भोसले याच्याशी कोणताही संबंध नसल्याचा दावा झोळ कुटूंबियांच्या बाजूने करण्यात येत आहे. असा प्रश्न पत्रकारांनी विचारल्यावर देसाई यांनी सांगितले की, यासाठी केंद्रीय यंत्रणेकडून याची चौकशी झाली पाहिजे. दुध का दुध आणि पाणी का पाणी होवून खऱ्या गुन्हेगारीला शिक्षा होईल.

धावत्या बसला अचानक आग

चालकाच्या हुशारीने मोठा अनर्थ टळला

कुर्डुवाडी (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात कुर्डूवाडी-बार्शी मार्गावरील चिंकहिल गावाजवळ धावत्या एसटी बसला अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत संपूर्ण बस जळून खाक झाली.

मात्र, बस चालकाने प्रसंगावधान राखत तातडीने बस रस्त्याच्या बाजूला थांबवल्याने मोठी दुर्घटना टळली.

उदगीर-पुणे या मार्गावर धावणाऱ्या एसटी बसमध्ये तब्बल ३७ प्रवासी प्रवास करत होते. बसला अचानक आग लागल्याचे लक्षात येताच चालकाने प्रसंगावधान राखून बस थांबवली. दरम्यान, बसमधील प्रवाशांमध्ये घबराट निर्माण झाली होती.

37 प्रवासी सुखरुप



घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली.

अग्निशमन दलाच्या जवानांनी आग विझवण्याचे प्रयत्न केले. मात्र, तोपर्यंत आगीने संपूर्ण बसला आपल्या विळख्यात घेतले होते.

बस चालकाने दाखवलेले प्रसंगावधान, उपस्थित तरुणांनी दाखवलेली सतर्कता यामुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेत सर्व ३७ प्रवासी सुखरूप बचावले.

ग्रंथालय चळवळीच्या प्रश्नांवर होणार मंथन

सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे ४७ वे वार्षिक अधिवेशन २९ नोव्हेंबरला

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या समस्या, ग्रंथालय चळवळीसमोरील आव्हाने, शासनाच्या विविध योजना तसेच ग्रंथालय प्रतिनिधींच्या अडीअडचणींवर चर्चा करून त्यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे ४७ वे वार्षिक अधिवेशन रविवार, दि. २९ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आले आहे. सरस्वती चौक येथील छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजमधील राजर्षी शाहू सभागृहात हे अधिवेशन पार पडणार असून, हुतात्मा सार्वजनिक वाचनालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. संघाचे अध्यक्ष ज्योतीराम गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार राहणार आहेत. अधिवेशनाचे उद्घाटन आमदार सुभाष बापू देशमुख आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मुंबईचे प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, पुण्याचे सहाय्यक ग्रंथालय संचालक योगेश बिर्जे, सोलापूरच्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर (देशमुख) उपस्थित राहणार आहेत.



तसेच महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष सोपानराव पवार, प्रमुख कार्यवाह गुलाबराव पाटील, तांत्रिक सहाय्यक प्रमोद पाटील, सोलापूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाचे ग्रंथालय निरीक्षक संजय ढेरे, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे कार्योपाध्यक्ष राम मेकले, कोषाध्यक्ष भीमराव पाटील, माजी महापौर तथा मराठा समाज सेवा मंडळाचे जनरल सेक्रेटरी मनोहर सपाटे, प्रा. महेश माने आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

ग्रंथालयांच्या प्रश्नांवर होणार चर्चा

या अधिवेशनात जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचे प्रतिनिधी आणि ग्रंथालय सेवकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, प्रतिनिधींच्या अडीअडचणींचे संबंधित शासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत निराकरण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. खुल्या अधिवेशनामध्ये ग्रंथालय क्षेत्राशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर ठराव मांडून ते मंजूर करण्यात येणार आहेत. हे ठराव पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाकडे पाठविण्यात येणार आहेत.

ग्रंथालय दिनदर्शिका २०२७ चे प्रकाशन

अधिवेशनाचे आणखी एक महत्त्वाचे आकर्षण म्हणजे सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या ग्रंथालय दिनदर्शिका २०२७ चे प्रकाशन यावेळी करण्यात येणार आहे. यामुळे जिल्ह्यातील ग्रंथालय चळवळीशी संबंधित माहिती आणि उपक्रमांना व्यापक प्रसिद्धी मिळण्यास मदत होणार आहे.

अधिवेशनस्थळी दुपारी ३ वाजता सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेत संघाच्या वार्षिक कामकाजासह ग्रंथालय चळवळीशी संबंधित विविध विषयांवर चर्चा होणार आहे. अधिवेशनासाठी प्रत्येक ग्रंथालयाचे दोन प्रतिनिधी उपस्थित राहणार असून, त्यापैकी एक प्रतिनिधी ग्रंथालय सेवक असणार आहे. यावेळी सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाची सार्वजनिक वाचनालयांची वार्षिक सभासद वर्गणी स्वीकारली जाणार आहे. अधिवेशनासाठी येणाऱ्या प्रतिनिधींच्या चहा व भोजनाची व्यवस्था आयोजकांच्या वतीने अधिवेशनस्थळी करण्यात आली आहे.

ग्रंथालय चळवळीतील सर्व घटकांना उपस्थितीचे आवाहन

सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा ग्रंथालय संघाचे सदस्य, सभासद, शासनमान्य सार्वजनिक वाचनालयांचे प्रतिनिधी, ग्रंथालय सेवक, साहित्यिक आणि ग्रंथालय चळवळीशी संबंधित सर्वांनी या अधिवेशनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेला संघाचे उपाध्यक्ष पांडुरंग सुरवसे, कार्यवाह साहेबराव शिंदे, कोषाध्यक्ष सारिका मार्डीकर, ग्रंथमित्र कुंडलिक मोरे, जयंत आराध्ये, धोंडीबा बंडगर, प्रकाश शिंदे, वृषाली हजारे आणि दीपाली नरखेडकर उपस्थित होते.

पक्षांतर करणाऱ्या आमदार-खासदारांच्या राजीनाम्याला चाप बसणार?

सर्वोच्च न्यायालयाची केंद्र सरकारला नोटीस

नागपूर (कटूसत्य वृत्त):- पक्षांतराच्या कारवाईपासून वाचण्यासाठी आमदार आणि खासदारांकडून रणनीतीपूर्वक राजीनामे दिले जात असल्याच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी घटनात्मक संरक्षणात्मक उपाययोजना करण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारसह निवडणूक आयोग आणि विधी आयोगाला नोटीस बजावली.

त्यामुळे पक्षांतरबंदी कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी आणि आमदारांच्या राजीनाम्यांचा राजकीय सत्तासमीकरणांवर होणारा परिणाम पुन्हा चर्चेत आला आहे.



पक्षांतराच्या कारवाईपूर्वी राजीनामा देण्याच्या प्रकारावर आक्षेप

भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. ए. सेथू यांनी दाखल केलेल्या याचिकेत असा आरोप करण्यात आला आहे की, अनेकदा आमदार किंवा खासदारांविरोधात पक्षांतरबंदी कायद्यांतर्गत अपात्रतेची कारवाई सुरू होण्याची शक्यता निर्माण होताच संबंधित लोकप्रतिनिधी राजीनामा देतात. त्यामुळे सभापती किंवा अध्यक्षांना अपात्रतेच्या याचिकेवर गुणवत्तेच्या आधारे निर्णय घेण्यापूर्वीच परिस्थिती बदलते. परिणामी, दहाव्या अनुसूचीतील तरतुदींचा उद्देशच निष्प्रभ ठरू शकतो.

राजीनामा दिला तरी अपात्रतेची कारवाई थांबणार नाही ?

याचिकाकर्त्याने श्रीमंत बाळासाहेब पाटील विरुद्ध कर्नाटक विधानसभा अध्यक्ष या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेतला आहे. केवळ राजीनामा दिल्याने आधी झालेल्या कथित पक्षांतरासंदर्भातील अपात्रतेची कारवाई आपोआप संपुष्टात येत नाही, असा युक्तिवाद करण्यात आला आहे. तसेच केशम मेघचंद्र सिंह विरुद्ध मणिपूर विधानसभा अध्यक्ष या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अपात्रतेच्या याचिकांवर साधारणपणे तीन महिन्यांत निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. अपवादात्मक परिस्थितीतच हा कालावधी वाढवता येऊ शकतो, असे याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

स्वतंत्र न्यायाधिकरणाची स्थापना करण्याची मागणी

अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय घेण्यासाठी सभापती किंवा अध्यक्षांवर अवलंबून असलेली सध्याची व्यवस्था राजकीय हस्तक्षेपाच्या शक्यतेमुळे मर्यादित ठरू शकते, असे याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे. त्यामुळे स्वतंत्र आणि कायमस्वरूपी न्यायाधिकरण स्थापन करण्याच्या व्यवहार्यतेचा विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, अपात्रतेच्या प्रकरणांतील नोटिसा, राजीनामे, सुनावणीच्या तारखा आणि अंतिम आदेश सार्वजनिक करण्याची मागणीही करण्यात आली आहे. (पान 2 वर..)

मंगळवेढ्यात युटोपियन कारखान्याच्या प्रवेशद्वारावर आंदोलन

मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):- ऊस दरावरून जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत मान्य केलेला तोडगा मंगळवेढ्यातील येथील साखर कारखानदारांनी मान्य केला नसल्यामुळे आज कचरेवाडी तील युरोपियन शुगर्स कारखान्याच्या प्रवेशद्वारावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने गव्हाण बंद आंदोलनाचा इशारा देत प्रवेशद्वारा आंदोलन सुरू केले.



यामध्ये नदीपट्ट्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा सहभाग दिसून आला. गेल्या आठवड्यात ऊस दरावरून कोल्हापूर जिल्ह्यातील आंदोलन यशस्वी झाल्यानंतर स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आपला मोर्चा सोलापूर जिल्ह्यावरकडे वळविला सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चामध्ये जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री यांच्या उपस्थित झालेल्या बैठकीत 3250+100+100 हा फॉर्मुला निश्चित करण्यात आला. मात्र तो फॉर्मुला त्यानंतर पंढरपूर येथील काही साखर कारखानदारांनी मान्य केल्याने त्या भागातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आंदोलन मागे घेतले.

मात्र मंगळवेढ्यातील साखर कारखानदारांनी अद्याप मान्य केला नसल्यामुळे याबाबतचे निवेदन स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कारखानदार व तहसीलदार यांना देत जिल्हाधिकारी यांच्या समवेत ठरलेला फार्मूला मान्य करावा मान्यता गव्हाण बंद करण्याचा इशारा देण्यात आला होता त्यानुसार आज युटोपियन कारखान्याच्या प्रवेशद्वारावर हे आंदोलन सुरू करण्यात आले यामध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा संघटक युवराज घुले, तालुकाध्यक्ष श्रीमंत केदार, अनिल बिराजदार, शंकर संघशेट्टी, शांताबा कुंभार, बंडू ढाणे, सुरेश कोळी, बाहुबली दोशी, तानाजी चव्हाण, रेवणसिद्ध सोलंकर, आदी सह शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

दुष्काळी परिस्थितीमुळे जिल्ह्यातील बहुतांश ऊस हा जनावराच्या चाऱ्यासाठी वापरला गेला. तर नदीपट्ट्यामध्ये उजनी धरणातून नदीपात्रात सोडण्यात आलेले पाणी वेळेवर न सोडल्यामुळे त्या भागातील देखील ऊस शेती धोक्यात आली. त्यामुळे साखर कारखाने हे लवकर बंद होण्याची शक्यता (पान 2 वर..)





संपादकीय

दुष्काळग्रस्त महाराष्ट्राला घोषणांपेक्षा वेळेवर मदत हवी !

दि मराठवाड्यातल्या एखाद्या गावात सकाळी सहा वाजता गेलात, तर दुष्काळ कसा दिसतो, हे कळेल. रिकामे हंडे घेऊन रांगेत उभ्या बायका, टँकर येणार की नाही याची वाट पाहणारी मुले आणि कोरड्या विहिरीकडे पाहत बसलेला शेतकरी. मुंबईत दुष्काळ एका शासन निर्णयाने जाहीर होतो; गावात तो रोज सकाळी नव्याने जाहीर होतो. यंदा २६ सप्टेंबरच्या शासन निर्णयाने २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर झाला. आता ही संख्या ३५८ पैकी ३०४ वर, म्हणजे जवळपास ८५ टक्के महाराष्ट्रावर पोहोचली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती नेमली गेली, बंद पाणी योजना तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले गेले आणि शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची प्राथमिक मदत जाहीर झाली. सरकारने काहीच केले नाही, असे नाही. पण काय जाहीर झाले, हा प्रश्न नाही; त्यातले किती गावापर्यंत पोहोचले आणि कधी, हा खरा प्रश्न आहे.

सरकारचे घड्याळ, गावाचे घड्याळ

दुष्काळ जाहीर करणे कागदावर होते, मदत जमिनीवर; आणि दोन्हींच्या मध्ये एक लांब, थकवणारा रस्ता आहे. दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार ह्याट्रिगर-१ह्न ही फक्त पहिली पायरी आहे. पिकांची स्थिती, जमिनीतील ओलावा आणि प्रत्यक्ष पाहणी पूर्ण झाल्याशिवाय भरपाई ठरत नाही. संपूर्ण पंचनाम्यांशिवाय मदतनिधी पाठवणार नाही, असे सरकारनेच सांगितले आहे. उपग्रह सांगतो की पीक करपले; पण तहानलेल्या माणसाला उपग्रहाची आकडेवारी पाणी देत नाही.

माज्या मते, दुष्काळ निवारणातली खरी अडचण पैशांची नाही, वेळेची आहे. सरकारचे घड्याळ बैठका, अहवाल, आर्थिक वर्ष आणि मंजुरीच्या साखळीने चालते; गावाची तहान मात्र रोज लागते. पाणी आज हवे असते; मंजुरी पुढच्या महिन्यात येते. ही दोन घड्याळे जुळली नाहीत, तर कितीही कोटी खर्च केले, तरी मदत उशिराच पोहोचते.

सरकारचा बिनव्याजी सावकार

याचे सर्वात स्पष्ट उदाहरण म्हणजे विहिरींचे थकलेले पैसे. दुष्काळात गावाला पाणी देणारी यंत्रणा बहुतेक वेळा सरकारी नसते. यंदा मेच्या मध्यात राज्यात पाणीपुरवठा करणाऱ्या सुमारे सातशे टँकरपैकी फक्त ३३ सरकारी होते. गावात ज्याच्या विहिरीत थोडे पाणी आहे, त्या शेतकऱ्याची विहीर प्रशासन ताब्यात घेते. म्हणजे दुष्काळात सरकार स्वत:च्या पायावर नाही, तर लोकांच्या खांद्यावर उभे असते. आता विचार करा. ज्या शेतकऱ्याने आपली विहीर गावासाठी दिली, त्याला महिनोनमहिने पैसे मिळाले नाहीत, तर तो काय समजेल? हा काल्पनिक प्रश्न नाही. गेल्या दोन वर्षात अधिग्रहित केलेल्या विहिरींची थकीत देयके २० नोव्हेंबरपर्यंत चुकती करा; नाहीतर शेतकरी पुन्हा विहिरी देणार नाहीत, असे खुद्द महसूलमंत्र्यांनी ४ नोव्हेंबरला अधिकाऱ्यांना सांगितले. म्हणजे दोन-दोन वर्षे पैसे थकल्याचे सरकारनेच मान्य केले आहे. दुष्काळाने आधीच अडचणीत असलेला शेतकरी सरकारला बिनव्याजी कर्ज देतो, ही गोष्टच उलटी आहे. थकलेली देयके हा फक्त हिशेबातला आकडा नाही; तो गाव आणि सरकार यांच्यातल्या विश्वासाला पडलेला तडा आहे.

अर्धवट योजनांचा फायदा कुणाला?

दुसरा मुद्दा अर्धवट योजनांचा. जल जीवन मिशनची सुमारे ७५ टक्के कामे पूर्ण झाली असून, उरलेली प्राधान्याने करा, असे उपसमितीने सांगितले. हे चांगलेच आहे. पण ही कामे इतकी वर्षे का रखडली, हे कोणी विचारत नाही. इथे एक कटू सत्य मान्य करावे लागेल. टँकरवर ज्यांचा धंदा चालतो, त्यांना नळ योजना पूर्ण होण्यात काय रस असणार? नळाला पाणी आले, तर टँकरचे काम संपते. म्हणजे योजना अर्धवट राहणे हा कधी कधी अपघात नसतो, तर कुणाच्या तरी फायद्याचा हिशेब असतो. पी. साईनाथ यांनी तीस वर्षांपूर्वी 'एव्हरीबडी लव्ह्ज अ गुड ड्रॉट' या पुस्तकात देशातल्या गरीब जिल्ह्यांत फिरून हेच दाखवले होते, दुष्काळ काहींसाठी संकट असतो, तर कंत्राटदार, मध्यस्थ आणि यंत्रणेतल्या काहींसाठी कमाईची संधी. टँकरच्या कागदावरच्या फेऱ्या आणि वर्षानुवर्षे 'जवळजवळ पूण' असलेल्या योजना पाहिल्या, तर साईनाथ यांचे म्हणणे अजून जुने झालेले नाही. या सगळ्याची सर्वात जास्त किंमत गावातली स्त्री मोजते. पाणी आणण्याची जबाबदारी बहुतेक घरांत तिचीच असते. टँकर दोन तास उशिरा आला, तर तिचे दोन तास जातात, मुलगी शाळेऐवजी घरी थांबते, मजुरी बुडते. दुष्काळाचा भार गरीब, भूमिहीन, दलित आणि स्त्रियांच्या खांद्यावर जास्त पडतो. दुष्काळ फक्त माणसांचा नसतो. चारा संपला की शेतकरी वर्षानुवर्षे सांभाळलेली जनावरे कवडीमोल भावात विकतो. पुढच्या वर्षी पाऊस चांगला झाला, तरी नांगरायला बैल नसतात. म्हणजे उशिरा आलेली मदत एका हंगामाचे नाही, तर पुढच्या हंगामांचेही नुकसान करते. शेवटी कुटुंब गाव सोडून शहराकडे निघते. महाराष्ट्राला हे नवे नाही. वि. स. पागे यांची रोजगार हमीची कल्पना १९७२ च्या भीषण दुष्काळात राज्यभर राबवली गेली आणि १९७७ मध्ये तिला कायद्याचे बळ मिळाले. दुष्काळग्रस्ताला भीक नव्हे; कामाचा हक्क हवा, हा तिचा गाभा होता. पुढे हीच कल्पना देशभर मनरेगा म्हणून पोहोचली. गेल्या डिसेंबरमध्ये मनरेगाच्या जागी 'व्हीबी-जी राम जी' हा नवा कायदा आला; कामाचा हक्क नव्या चौकटीत टिकतो की पातळ होतो, याची कसोटी याच दुष्काळात लागेल. अमर्त्य सेन यांचे निरीक्षण आहे, की मुक्त वृत्तपत्रे आणि प्रश्न विचारणारे लोक असलेल्या लोकशाहीत दुष्काळाचे रूपांतर उपासमारीत होऊ देणे सरकारला परवडत नाही. पण लोक प्रश्न तेव्हाच विचारू शकतात, जेव्हा त्यांच्याकडे माहिती असते.

तालुक्याचा सार्वजनिक दुष्काळ हिशेब

म्हणून प्रत्येक दुष्काळग्रस्त तालुक्याचा 'दुष्काळ हिशेब' दर पंधरा दिवसांनी तहसील कार्यालयाच्या फलकावर आणि संकेतस्थळावर लावावा. किती विहिरी घेतल्या आणि त्यांचे किती पैसे किती दिवसांपासून बाकी आहेत, कोणता टँकर कोणत्या गावात किती फेऱ्या करतो, कोणती योजना किती पूर्ण आहे आणि कधी पूर्ण होणार, पाच हजारांची मदत किती खात्यांत प्रत्यक्ष जमा झाली; हे सगळे लोकांना दिसले पाहिजे. माहिती अधिकार कायद्याच्या कलम ४ नुसार अशी माहिती स्वत:हून जाहीर करणे सरकारचे कर्तव्यच आहे. तीस दिवसांत विहिरीचे पैसे न दिल्यास ते व्याजासह द्यावे लागतील, असा नियम करावा आणि हा हिशेब ग्रामसभेत वाचून दाखवावा. यामुळे खर्च वाढणार नाही; उलट, जिथे गळती आहे, ती थांबेल. ज्याचे पैसे थकले आहेत, त्याला दाद मागता येईल आणि अधिकाऱ्यांना कळेल की गाव त्यांच्या कामाकडे बघत आहे. दुष्काळावर किती कोटी खर्च झाले, यावरून यश मोजता येत नाही. मदत किती वेळेवर पोहोचली, हाच खरा प्रश्न आहे. उशिरा आलेली मदत म्हणजे पावसाळा संपल्यावर आलेला ढग; दिसतो, पण शेत भिजवत नाही. सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे. आता गावाने 'मदत मिळाली' असे जाहीर करण्याची वेळ यायला हवी.

पान १ वरून

मंगळवेढ्यात युटोपियन कारखान्याच्या...

आहे. शिवाय अशा परिस्थितीत ऊस दर अद्याप निश्चित केला नाही मग दर कधी निश्चित करणार असा प्रश्न ऊस उत्पादकातून उपस्थित केला जात असतानाच वाहन मालक ,तोडणी मालकाचे दर अगोदर निश्चित केला जातात परंतु ज्याच्यावर साखर कारखाना अवलंबून असतात त्यांचे दर निश्चित करण्यासाठी विलंब का लावला जातो असा प्रश्न देखील यावेळी उपस्थित करण्यात आला.

यावेळी अनिल बिराजदार शंकर संघशेट्टी, युवराज घुले यांची भाषणे झाली. तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्याचा ऊस हा खर्डी येथील सिताराम महाराज सहकारी साखर कारखान्याला जात आहे त्या कारखानदाराने देखील हा तोडगा मान्य केल्याचे पत्र स्वाभिमानी शेतकरी संघटनेला दिले आहे.

पक्षांतर करणाऱ्या आमदार-खासदार...

राजीनामा देणाऱ्यांना मंत्रिपदापासून रोखण्याची मागणी

प्रलंबित किंवा संभाव्य अपात्रता कारवाईच्या पार्श्वभूमीवर राजीनामा देणाऱ्या लोकप्रतिनिधींना अपात्रतेचा प्रश्न त्यांच्या बाजूने निकाली निघेपर्यंत किंवा ते पुन्हा निवडून येईपर्यंत मंत्रिपदासारखी लाभाची राजकीय पदे देऊ नयेत, अशी मागणीही याचिकेत आहे. तसेच त्रिशंकू विधानसभेत बहुमत सिद्ध करण्यासाठी निवडून आलेल्या सदस्यांचा शपथविधी झाल्यानंतरच सभागृहात विश्वासदर्शक ठराव घ्यावा, असेही याचिकाकर्त्याने म्हटले आहे. या प्रकरणाची सुनावणी आता महत्त्वाची ठरणार आहे. कारण सर्वोच्च न्यायालयाचा पुढील निर्णय पक्षांतरबंदी कायद्याची अंमलबजावणी, लोकप्रतिनिधींच्या राजीनाम्यांचा परिणाम आणि राज्यांमधील सत्तांतराच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करू शकतो.

यशवंतराव चव्हाण : महाराष्ट्राच्या जडणघडणीचे शिल्पकार

महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वांचे योगदान इतके महत्त्वपूर्ण आहे की, त्यांच्या कार्याचा विचार केल्याशिवाय आधुनिक महाराष्ट्राची ओळख पूर्ण होऊ शकत नाही. अशा व्यक्तिमत्त्वांमध्ये यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, देशाचे संरक्षणमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, उपपंतप्रधान आणि एक अभ्यासू विचारवंत म्हणून त्यांनी भारतीय राजकारणात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ सत्तेच्या राजकारणापुरते मर्यादित नव्हते, तर समाजाच्या सर्वांगीण विकासाची व्यापक दृष्टी, लोकशाहीवरील निष्ठा, ग्रामीण विकासाची तळमळ, शिक्षणाविषयीची आस्था आणि सामाजिक समतेची भूमिका या गुणवैशिष्ट्यांनी ते समृद्ध होते. २५ नोव्हेंबर हा त्यांचा स्मृतिदिन. या निमित्ताने त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे महाराष्ट्राच्या जडणघडणीतील एका महत्त्वपूर्ण पर्वाचा आढावा घेणे होय.

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावात एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांना प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागला. वडिलांचे छत्र लहानपणीच हरपल्यामुळे त्यांच्या आई विठाबाई यांनी कष्टाने आणि जिद्दीने त्यांचे संगोपन केले. आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही त्यांनी मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. ग्रामीण जीवनातील संघर्ष, शेतकऱ्यांच्या अडचणी, सामान्य माणसाचे प्रश्न आणि सामाजिक विषमता यांचा अनुभव यशवंतरावांना बालपणापासून मिळाला. या अनुभवांनी त्यांच्या विचारविश्वाला आकार दिला. पुढे राजकीय जीवनात त्यांनी ग्रामीण समाजाच्या विकासाला आणि सामान्य माणसाच्या उन्नतीला जे महत्त्व दिले, त्यामागे त्यांच्या बालपणातील अनुभवांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. शिक्षण घेत असतानाच त्यांच्यामध्ये राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीविषयी आकर्षण निर्माण झाले. महात्मा गांधींचे विचार, लोकमान्य टिळकांचे राष्ट्रप्रेम, महात्मा फुले यांची सामाजिक परिवर्तनाची भूमिका आणि राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक न्यायाचे कार्य यांचा त्यांच्या वैचारिक जडणघडणीवर प्रभाव पडला. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि लोकशाही या मूल्यांविषयी त्यांच्या मनात आदर निर्माण झाला. १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीच्या काळात त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेतला. विद्यार्थिदशेतच राष्ट्रीय कार्यात सहभागी झाल्यामुळे त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग हा त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा महत्त्वपूर्ण प्रारंभ ठरला. त्यांनी राजकारणाकडे केवळ सत्ताप्राप्तीचे साधन म्हणून न पाहता समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणून पाहिले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशासमोर लोकशाही व्यवस्था स्थिर करण्याचे, सामाजिक विषमता दूर करण्याचे आणि आर्थिक विकासाची पायाभरणी करण्याचे मोठे आव्हान होते. त्याच काळात महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीची मागणीही अधिक तीव्र झाली होती. भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नावर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उभी राहिली. मराठी भाषिक प्रदेशांचे एकसंध राज्य निर्माण व्हावे, ही जनतेची भावना होती. या चळवळीमध्ये अनेक कार्यकर्ते, विचारवंत, साहित्यिक आणि सामान्य नागरिक सहभागी झाले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी झालेल्या संघर्षात अनेकांनी बलिदान दिले. या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. नव्याने स्थापन झालेल्या राज्याच्या प्रशासनाची, विकासाची आणि सामाजिक ऐक्याची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली. ही जबाबदारी त्यांनी दूरदृष्टीने आणि समन्वयवादी दृष्टिकोनातून पार पाडली.

नवीन महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर राज्यासमोर अनेक मूलभूत प्रश्न होते. ग्रामीण भागातील दारिद्र्य, शेतीची अनिश्चितता, औद्योगिक विकासाचा अभाव, शिक्षणाच्या मर्यादित सुविधा, पायाभूत सुविधांची कमतरता आणि प्रादेशिक असमतोल ही प्रमुख आव्हाने होती. या सर्व प्रश्नांकडे त्यांनी परस्परांशी संबंधित विकासाच्या दृष्टीने पाहिले. महाराष्ट्राचा विकास केवळ मुंबई, पुणे किंवा काही प्रमुख शहरांपुरता मर्यादित राहू नये, तर ग्रामीण आणि दुर्गम भागांपर्यंत पोहोचावा, अशी त्यांची भूमिका होती. विकासाच्या प्रक्रियेत समाजातील सर्व घटकांना सहभागी करून घेणे आवश्यक आहे, याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच त्यांनी प्रशासन, सहकार, शिक्षण, शेती आणि उद्योग या क्षेत्रांना विकासाच्या व्यापक आराखड्यात महत्त्वाचे स्थान दिले.

महाराष्ट्राच्या विकासात सहकार चळवळीला त्यांनी विशेष महत्त्व दिले. ग्रामीण भागातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा, त्याला उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक आणि बाजारपेठ यांमध्ये योग्य संधी मिळाव्यात, यासाठी सहकार हे प्रभावी माध्यम ठरू शकते, असा त्यांचा विश्वास होता. सहकारी साखर कारखाने, सहकारी दूध संस्था, सहकारी पतसंस्था आणि कृषीविषयक सहकारी संस्था यांच्या विकासाला त्यांनी प्रोत्साहन दिले. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आर्थिक उपक्रम उभारावेत आणि सामूहिक प्रयत्नांतून स्वतःची प्रगती साधावी, हा सहकाराचा मूलभूत विचार त्यांनी पुढे नेला. सहकारामुळे ग्रामीण भागात आर्थिक व्यवहारांना चालना मिळाली, रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आणि स्थानिक नेतृत्व विकसित होण्यास मदत झाली. महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या परिवर्तनात सहकार चळवळीने महत्त्वाची भूमिका बजावली.

ग्रामीण लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी त्यांनी पंचायत राज व्यवस्थेचा पुरस्कार केला. लोकशाही केवळ संसद आणि विधानसभेपुरती मर्यादित न राहता गावपातळीपर्यंत पोहोचली पाहिजे, असे त्यांचे मत होते. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या त्रिस्तरीय व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना स्थानिक विकासाच्या निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार आणि जबाबदाऱ्या मिळाल्यास गावांच्या गरजांनुसार विकासकामे करता येतील, असा त्यांचा विश्वास होता. महाराष्ट्रातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती व्यवस्थेच्या उभारणीला त्यांनी प्रोत्साहन दिले. या व्यवस्थेमुळे ग्रामीण नेतृत्वाला संधी मिळाली, स्थानिक पातळीवरील लोकशाही प्रक्रिया मजबूत झाली आणि ग्रामीण भागातील विकासाच्या प्रश्नांना संस्थात्मक स्वरूप प्राप्त झाले. आज विकेंद्रीकरण, ग्रामविकास आणि लोकसहभाग यांची चर्चा करताना त्यांच्या या दूरदृष्टीचे महत्त्व लक्षात येते. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वांत प्रभावी साधन आहे, अशी त्यांची ठाम धारणा होती. समाजातील गरीब, वंचित, ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत शिक्षण पोहोचल्याशिवाय सामाजिक समता निर्माण होऊ शकत नाही, हे त्यांनी ओळखले होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी त्यांनी शिक्षणसंस्थांच्या विस्ताराला प्रोत्साहन दिले. रयत शिक्षण संस्थेशी त्यांचा निकटचा संबंध होता. शिक्षणाचा प्रसार, शैक्षणिक संस्थांचे बळकटीकरण आणि विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणे या बाबींना



त्यांनी महत्त्व दिले. शिक्षण हे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकास, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदार नागरिकत्व निर्माण करण्याचे माध्यम आहे, अशी त्यांची भूमिका होती. ग्रामीण भागातील मुलामुलींना शिक्षणाची संधी मिळाल्यास त्यांच्या जीवनात परिवर्तन घडू शकते आणि त्यातून संपूर्ण समाजाच्या विकासाला गती मिळू शकते, असा त्यांचा विश्वास होता.

शेती आणि उद्योग यांच्यात समतोल साधण्याची त्यांची आर्थिक विकासविषयक भूमिका विशेष उल्लेखनीय होती. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर आधारित असल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेतीचे आधुनिकीकरण करणे, सिंचनाच्या सुविधा निर्माण करणे आणि कृषी उत्पादनाला योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, याची त्यांना जाणीव होती. त्याच वेळी केवळ शेतीवर अवलंबून राहून राज्याचा आर्थिक विकास साधता येणार नाही, हेही त्यांनी ओळखले होते. त्यामुळे कृषीपूरक उद्योग, लघुउद्योग, मध्यम उद्योग आणि मोठ्या औद्योगिक प्रकल्पांच्या विकासाला त्यांनी चालना दिली. शेतीमधील उत्पादनाला प्रक्रिया उद्योगांची जोड मिळाल्यास ग्रामीण भागात रोजगार निर्माण होईल, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम बनेल, अशी त्यांची विकासाची संकल्पना होती. कृषी आणि औद्योगिक क्षेत्रांचा परस्परपूरक विकास हा त्यांच्या आर्थिक विचारांचा महत्त्वाचा आधार होता.

सिंचन, वीज, रस्ते, वाहतूक आणि दळणवळण यांसारख्या पायाभूत सुविधांच्या विकासालाही त्यांनी प्राधान्य दिले. ग्रामीण भागातील विकासासाठी पायाभूत सुविधांची उपलब्धता आवश्यक असते. शेतीला पाणी, उद्योगांना वीज, बाजारपेठांपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ते आणि नागरिकांसाठी शिक्षण व आरोग्याच्या सुविधा उपलब्ध झाल्याशिवाय विकासाची प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे राज्याच्या विकासाचे नियोजन करताना त्यांनी विविध क्षेत्रांचा एकत्रित विचार केला. विकासाचा लाभ केवळ संपन्न आणि शहरी भागांपुरता मर्यादित राहू नये, तर दुर्गम, आदिवासी आणि मागास भागांतील नागरिकांनाही मिळावा, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. प्रादेशिक असमतोल दूर करण्याची आवश्यकता त्यांनी सातत्याने अधोरेखित केली. महाराष्ट्राच्या विकासाला एक व्यापक आणि सर्वसमावेशक दिशा देण्याचे त्यांचे कार्य या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते.

१ नोव्हेंबर १९५६ पासून द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले होते. त्यामुळे प्रशासकीय अनुभव, विविध भाषिक समूहांशी संवाद आणि राज्याच्या राजकीय गुंतागुंतीचे आकलन त्यांना आधीपासूनच होते. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर मराठी भाषिक जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्याबरोबरच राज्यातील सर्व समाजघटकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण करणे हे त्यांच्यासमोरचे महत्त्वाचे आव्हान होते. त्यांनी प्रादेशिक किंवा भाषिक भावनांना संघर्षाचे स्वरूप न देता विकासाच्या समान ध्येयाभोवती समाजाला एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर त्यांनी केलेले एक महत्त्वाचे आवाहन म्हणजे, राज्यनिर्मितीसाठी झालेला संघर्ष इतिहासजमा करून आता नव्या महाराष्ट्राच्या उभारणीसाठी सर्वांनी एकत्र यावे. या भूमिकेतून त्यांचा समन्वयवादी दृष्टिकोन आणि व्यापक लोकशाही विचार स्पष्ट होतो.

१९६२ मध्ये भारत-चीन युद्धानंतर देशाच्या संरक्षण व्यवस्थेसमोर गंभीर आव्हान निर्माण झाले. अशा परिस्थितीत तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना केंद्रीय मंत्रिमंडळात संरक्षणमंत्री म्हणून काम करण्यासाठी दिल्लीला बोलावले. राज्याच्या राजकारणातून राष्ट्रीय राजकारणात प्रवेश करताना त्यांच्यावर देशाच्या संरक्षणाची मोठी जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांनी संरक्षणमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर भारतीय सैन्यदलांचे मनोबल उंचावणे, संरक्षण व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे, आधुनिक शस्त्रसामग्रीची आवश्यकता ओळखणे आणि संरक्षण क्षेत्रात स्वावलंबन निर्माण करणे यांवर भर दिला. युद्धानंतरच्या निराशाजनक वातावरणातून देशाला बाहेर काढण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. सैनिकांचे मनोबल, सैन्यदलांचे आधुनिकीकरण आणि राष्ट्रीय सुरक्षेची जाणीव यांना त्यांनी विशेष महत्त्व दिले. त्यांच्या कार्यकाळात संरक्षण व्यवस्थेच्या पुनर्बांधणीसाठी महत्त्वपूर्ण प्रयत्न झाले. संकटाच्या काळात शांतपणे परिस्थितीचे आकलन करून योग्य निर्णय घेण्याची त्यांची क्षमता या जबाबदारीतून दिसून आली.

केंद्रीय मंत्रिमंडळात त्यांनी संरक्षणमंत्रिपदानंतर गृहमंत्री, अर्थमंत्री आणि परराष्ट्रमंत्री अशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. १९६६ ते १९७० या काळात त्यांनी केंद्रीय गृहमंत्री म्हणून देशातील अंतर्गत सुरक्षा, सामाजिक सलोखा आणि प्रशासकीय प्रश्न हाताळले. १९७० ते १९७४ या काळात अर्थमंत्री म्हणून देशाच्या आर्थिक व्यवस्थापनात योगदान दिले. अर्थव्यवस्थेतील आव्हाने, विकासासाठी आवश्यक असलेली आर्थिक साधनसंपत्ती आणि विविध क्षेत्रांमधील संसाधनांचे नियोजन यांसारख्या प्रश्नांवर त्यांनी काम केले. १९७४ ते १९७७ या काळात परराष्ट्रमंत्री म्हणून त्यांनी भारताचे आंतरराष्ट्रीय संबंध अधिक दृढ करण्यासाठी प्रयत्न केले. भारताचे राष्ट्रीय हित जपत जागतिक राजकारणातील बदलत्या परिस्थितीचा विचार करण्याची त्यांची भूमिका होती. १९७९ मध्ये त्यांनी भारताचे उपपंतप्रधान आणि गृहमंत्री म्हणूनही जबाबदारी सांभाळली. देशाच्या विविध महत्त्वपूर्ण पदांवर काम करताना त्यांनी प्रशासकीय अनुभव, अभ्यासपूर्ण दृष्टिकोन आणि निर्णयक्षमता यांचा परिचय करून दिला.

यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व केवळ कुशल प्रशासक आणि राजकारणी म्हणून मर्यादित नव्हते. ते उत्तम वक्ते, साहित्यप्रेमी, वाचनशील आणि चिंतनशील विचारवंत होते. राजकारण आणि साहित्य यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध असतो, असे त्यांचे मत होते. समाजातील बदल, मानवी नातेसंबंध, ग्रामीण जीवन, संस्कृती आणि राजकीय घडामोडी यांचे सूक्ष्म निरीक्षण करण्याची त्यांची वृत्ती होती. मराठी साहित्य, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र आणि राजकीय विचार यांचा त्यांनी अभ्यास केला होता. साहित्यिक, लेखक, कवी आणि विचारवंत यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात राजकीय व्यवहारज्ञान आणि सांस्कृतिक संवेदनशीलता यांचा सुंदर संगम दिसून येतो. महाराष्ट्राच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक जीवनाच्या विकासाला त्यांनी प्रोत्साहन दिले. सार्वजनिक जीवनात विचारांची समृद्धी आणि सांस्कृतिक जाणिवा आवश्यक आहेत, याची त्यांना जाणीव होती. त्यांचे कृष्णाकाठ हे आत्मचरित्र मराठी साहित्यविश्वातील एक महत्त्वपूर्ण पुस्तक आहे. या पुस्तकातून त्यांच्या बालपणापासूनच्या जीवनप्रवासाचे, ग्रामीण समाजजीवनाचे, स्वातंत्र्य चळवळीतील अनुभवांचे आणि राजकीय जडणघडणीचे दर्शन घडते. त्यांच्या जीवनातील संघर्ष, आईचे संस्कार, सामाजिक परिस्थिती, राजकीय विचारांची निर्मिती आणि सार्वजनिक जीवनातील अनुभव यांचे त्यांनी अत्यंत आत्मीयतेने चित्रण केले आहे. कृष्णाकाठ हे केवळ एका राजकीय नेत्याचे आत्मचरित्र नाही, तर विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. या लेखनातून त्यांच्यातील संवेदनशील माणूस, चिकित्सक विचारवंत आणि समाजाच्या प्रश्नांशी एकरूप झालेला कार्यकर्ता वाचकांसमोर येतो. त्यांच्या भाषेत सहजता, अनुभवांची प्रगल्भता आणि विचारांची स्पष्टता आढळते.

त्यांच्या राजकीय विचारांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्याय यांवरील त्यांची निष्ठा. समाजात विविध जाती, धर्म, भाषा, संस्कृती आणि आर्थिक स्तरांतील लोक एकत्र राहतात. या विविधतेचा आदर राखून समाजात बंधुभाव निर्माण करणे हे लोकशाही व्यवस्थेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे, अशी त्यांची धारणा होती. सामाजिक विषमता, जातीय भेदभाव आणि आर्थिक शोषण यांमुळे समाजाची प्रगती खुंटते, याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे समाजातील दुर्बल घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे, असे ते मानत. लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका आणि सत्तांतर नव्हे, तर सामान्य नागरिकांच्या जीवनात प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, समान संधी आणि न्याय निर्माण करणारी व्यवस्था होय, असा त्यांच्या राजकीय भूमिकेचा आशय होता. विरोधी विचारांचा आदर करणे, चचेर्तून मार्ग काढणे आणि मतभेद असूनही संवाद कायम ठेवणे ही त्यांची कार्यपद्धती होती. राजकीय विरोधकांशीही सुसंवाद राखण्याची त्यांची क्षमता त्यांच्या लोकशाही स्वभावाचे वैशिष्ट्य होते.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वात संयम, नम्रता, अभ्यासू वृत्ती आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याची क्षमता होती. राजकारणात यशस्वी होण्यासाठी केवळ लोकप्रियता पुरेशी नसते, तर समाजाच्या प्रश्नांची जाण, व्यापक वाचन, परिस्थितीचे विश्लेषण आणि योग्य निर्णय घेण्याची क्षमता आवश्यक असते, हे त्यांनी आपल्या कायार्तून दाखवून दिले. राजकीय मतभेदांना वैयक्तिक शत्रुत्वाचे स्वरूप न देता वैचारिक पातळीवर चर्चा करण्याची त्यांची भूमिका आजच्या राजकीय वातावरणातही महत्त्वपूर्ण आहे. सार्वजनिक जीवनातील व्यक्तीने आपल्या पदापेक्षा जबाबदारीला अधिक महत्त्व द्यावे, अशी त्यांची कार्यशैली होती. सत्ता ही समाजसेवेचे साधन आहे, हे त्यांनी आपल्या संपूर्ण राजकीय प्रवासातून अधोरेखित केले. यशवंतराव चव्हाण यांच्या कायार्चा विचार करताना त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात निर्माण झालेल्या विकासाच्या पायाभूत रचनेचा विशेष उल्लेख करावा लागतो. सहकार चळवळ, पंचायत राज व्यवस्था, शिक्षणाचा प्रसार, कृषी आणि औद्योगिक विकास, ग्रामीण नेतृत्वाची निर्मिती आणि सांस्कृतिक क्षेत्राला मिळालेले प्रोत्साहन या विविध क्षेत्रांतील त्यांच्या योगदानामुळे आधुनिक महाराष्ट्राच्या विकासाला दिशा मिळाली. त्यांनी सुरू केलेल्या अनेक विकासविषयक प्रक्रियांचा प्रभाव पुढील अनेक दशकांपर्यंत राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनावर राहिला. त्यांच्या कार्याचा वारसा केवळ प्रशासकीय निर्णयांमध्ये नसून महाराष्ट्राच्या विकासाविषयी निर्माण झालेल्या व्यापक दृष्टिकोनात आहे. ग्रामीण भागातील सामान्य माणसालाही विकासाच्या प्रक्रियेत सह

हुतात्मा स्मृती मंदिराचे होणार नूतनीकरण

एसटीपीचे प्रक्रिया केलेले पाणी बांधकामासाठी नाममात्र दरात उपलब्ध होणार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहरातील विविध प्रलंबित विकासकामे, नागरी सुविधा आणि पर्यावरण संवर्धनाच्या विषयांना गती देण्यासाठी महापौर कार्यालयात महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेचे प्रमुख पदाधिकारी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या बैठकीत शहरातील विविध प्रश्नांची वस्तुस्थिती आयुक्तांसमोर मांडण्यात आली.

त्यानंतर संबंधित विषयांना आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद देत हिरवा कंदील दिला. हे विषय तातडीने अजेंड्यावर घेऊन आवश्यक कार्यवाही करत मार्गी लावण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.या बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरीताई देवकर, सभागृह नेते नरेंद्रजी काळे, स्थायी समिती सभापती रंजिताताई चाकोते, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, शहराध्यक्ष तथा नगरसेविका रोहिणीताई तडवळकर, महिला व बालकल्याण सभापती निर्मला जंगम,उद्यान सभापती राजशेखर पाटील, आरोग्य सभापती सुनील खटके, विधी सभापती सत्यजित वाघमोडे स्थापत्य समिती सभापती विजय चिप्पा अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार नगर अभियंता नीलकंठ मठपती यांच्यासह महापालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

हुतात्मा स्मृती मंदिराचे होणार नूतनीकरण व सुशोभीकरण

सोलापूर शहराची सांस्कृतिक ओळख असलेल्या हुतात्मा स्मृती मंदिराचे गेल्या पंधरा वर्षांपासून कोणतेही मोठे नूतनीकरण झालेले नाही. त्यामुळे या नाट्यगृहाच्या सुधारणेसाठी महापौरांनी विशेष पुढाकार घेतला आहे. यामध्ये नाट्यगृहातील खुर्च्यांची दुरुस्ती व आवश्यकतेनुसार बदल, हुतात्मा स्मृती मंदिर मधील स्टेज, छताची दुरुस्ती, मध्यवर्ती वातानुकूलन यंत्रणेची सुधारणा, तसेच नाट्यगृहाच्या



मागील बाजूस असलेल्या कलाकारांच्या विश्रामखोल्यांची दुरुस्ती आणि रंगरंगोटी करण्यात येणार आहे. या सर्व कामांसाठी आवश्यक कार्यवाही तातडीने सुरू करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.

एसटीपीचे प्रक्रिया केलेले पाणी बांधकामासाठी नाममात्र दरात उपलब्ध होणार

सोलापूर शहरात सध्या पाण्याची वाढती गरज आणि पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेता पिण्यायोग्य पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. यासाठी महापालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रांमधून (एसटीपी) प्रक्रिया केलेले पाणी बांधकाम व्यावसायिकांना नाममात्र दरात उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. साधारणतः १२० ते १५० रुपये दरात टँकरद्वारे हे पाणी बांधकामासाठी उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात आली. शहरातील चार एसटीपी प्रकल्पांपैकी तीन प्रकल्प सध्या कार्यरत असून, त्यांच्यामार्फत दररोज सुमारे ७० ते ८० एमएलडी प्रक्रिया केलेले पाणी उपलब्ध होते. या पाण्याचा अधिकाधिक पुनर्वापर व्हावा, यासाठी महापालिका विशेष प्रयत्न करणार आहे. बांधकाम व्यावसायिकांना हे पाणी उपलब्ध करून दिल्यास पिण्यायोग्य पाण्यावरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

दुभाजकांतील झाडांना नियमित पाणी देण्याच्या सूचना

शहरातील रस्त्यांच्या दुभाजकांमध्ये लावण्यात आलेली झाडे आणि वृक्षांचे योग्य संवर्धन व्हावे, यासाठी महापौरांनी उद्यान विभागाला विशेष सूचना दिल्या. दुभाजकांमधील झाडांना नियमित आणि पुरेशा प्रमाणात पाणी देण्यात यावे, त्यांची योग्य निगा राखावी तसेच झाडे सुकणार नाहीत याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश संबंधित मक्तेदार आणि उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले.

एसटीपीमधून उपलब्ध होणाऱ्या प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर रस्त्यांच्या दुभाजकांतील झाडे, शहरातील उद्याने आणि बगीच्यांच्या सिंचनासाठी करण्यावरही भर देण्यात आला. यामुळे पिण्याच्या पाण्याची बचत होण्याबरोबरच शहरातील हरित क्षेत्राचे संवर्धन होण्यास मदत होणार आहे.

उद्यानांच्या देखभालीवर विशेष भर

शहरातील विविध उद्यानांची स्वच्छता, हिरवळ, झाडांचे संवर्धन, पाणीपुरवठा आणि नागरिकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचा आढावा घेण्यात आला. उद्यानांची नियमित देखभाल करावी, नागरिकांना स्वच्छ व सुंदर उद्याने उपलब्ध करून द्यावीत, तसेच उद्यान विभाग आणि संबंधित मक्तेदारांनी आपल्या जबाबदाऱ्या योग्य प्रकारे पार पाडाव्यात, अशा सूचना महापौरांनी दिल्या. शहरातील पाणी बचत, पर्यावरण संवर्धन, सांस्कृतिक वारशाचे जतन आणि नागरी सुविधांचा दर्जा उंचावणे या बाबींना प्राधान्य देऊन सर्व प्रलंबित विषय वेळेत पूर्ण करण्यासाठी महापालिका प्रशासनाने समन्वयाने काम करावे, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

11 प्राथमिक आरोग्य केंद्रांचा होणार कायापालट !

ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला स्मार्ट बनविण्याचा चेतनसिंह केदार : सावंत यांचा संकल्प



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण करण्याच्या दिशेने जिल्हा परिषद आरोग्य व शिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जिल्ह्यातील ११ प्राथमिक आरोग्य केंद्रांचे स्मार्ट रूपांतरण करण्याचा संकल्प राज्याचे ग्रामविकास पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्हा पालकमंत्री श्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य व शिक्षण सभापती श्री. चेतनसिंह केदार सावंत यांनी केला आहे.

या संकल्पांतर्गत उत्तर सोलापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र मार्डी, दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र भंडारकवठे, बार्शी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र पानगाव, अक्कलकोट तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र चपळगाव, मोहोळ तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र पाटकूल, माढा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र मोडनिंब, करमाळा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र केम, पंढरपूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र खर्डी, मंगळवेढा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आंधळगाव, माळशिरस तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र मोरोची आणि सांगोला तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र नाझरा या सर्व ११ प्राथमिक आरोग्य केंद्राचा ठराव जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य,जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीतजी पवार, सभापती रामाप्पाजी चिवडशेट्टी, सभापती अमृताताई वाघे, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. कुशलजी जैन, सहाय्यक मुख्य कार्यकारी अधिकारी मा. संदिपजी कोहीणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी मा. सुर्यकांत भुजबळ, प्रकल्प संचालक मा. चंद्रशेखर जगताप, जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ सतीश कोपूरवाड तसेच सर्व जिल्हा परिषद सदस्य व अधिकारी वर्ग या सर्वमान्यवरांच्या उपस्थित ठराव घेण्यात आला.

या आरोग्य केंद्रांमध्ये मॉड्युलर शस्त्रक्रियागृह, मॉड्युलर प्रसूतीगृह, पाणीपुरवठा व्यवस्था तसेच स्वच्छतागृहांची दुरुस्ती व आवश्यक सुविधांचे आधुनिकीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना स्थानिक स्तरावरच दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी आणि आरोग्य केंद्रांचा कायापालट व्हावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

केवळ इमारतींचा विकास नव्हे, तर आरोग्य सेवेच्या गुणवत्तेत परिवर्तन घडवून ग्रामीण जनतेला आधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा संकल्प आहे.

आरोग्य सेवेला आधुनिकतेची जोड देत, ग्रामीण जनतेच्या आरोग्याचा दर्जा उंचावण्यासाठी सभापती चेतनसिंह केदार सावंत यांच्या पुढाकारातून सोलापूर जिल्हा आरोग्य व्यवस्था परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करत आहे.

रेशन दुकानदारांच्या अडचणींची मला जाणीव

जिल्हा बँकेत त्यांच्यासाठी चांगली योजना आणणार- पालकमंत्री गोरे

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- "मी स्वतः एका रेशन दुकानदाराचा मुलगा आहे आणि हे सांगण्यास मला कधीही लाज वाटत नाही. रेशन दुकानदारांच्या सर्व अडचणी आणि समस्या मला माहिती आहेत. येणाऱ्या काळात जिल्हा बँकेच्या माध्यमातून रेशन दुकानदारांसाठी एखादी चांगली योजना आणण्याचा माझा प्रयत्न राहील," असे भावनिक वक्तव्य पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.



सोलापुरातील शासकीय विश्रामगृहात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत रास्त भाव धान्य दुकानदार संघटनेचे सचिव नितीन पेंटर, सोलापूर जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे आणि सोलापूर लेबर फेडरेशनचे चेअरमन शंकर चौगुले यांनी सहकार पॅनलला पाठिंबा जाहीर केला.

यावेळी आमदार देवेंद्र कोठे, भाजप शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, लोकमंगल मल्टीस्टेटचे रोहन देशमुख, दिलीप पतंगे, राजकुमार हंचाटे, नगरसेवक अजय पोन्नम, अक्षय अंजीखाने यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

रेशन दुकानदारांच्या प्रश्नांबाबत बोलताना पालकमंत्री गोरे यांनी आपल्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा उल्लेख केला. रेशन दुकानदारांच्या अडचणींची आपल्याला जवळून माहिती असून, त्यांच्या हितासाठी जिल्हा बँकेच्या माध्यमातून योजना आणण्याचा शब्द त्यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिला.

या बैठकीला रास्त भाव धान्य दुकानदार संघटना, पतसंस्था आणि विविध फेडरेशनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी सहकार पॅनलला पाठिंबा जाहीर केला.

शासनमान्य ग्रंथपालन प्रशिक्षण प्रवेशासाठी आवाहन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या ग्रंथालय संचालनालयाच्या वतीने सर्व समावेशक, शाळा, कॉलेज, आश्रमशाळा, सार्वजनिक ग्रंथालय, रेल्वे महामंडळ, कोर्ट, कृषी विभाग, कृषी विद्यापीठ, खाजगी कंपन्या इत्यादी विभागात ग्रंथपाल, ग्रंथालय सहाय्यक, निर्गम सहाय्यक, ग्रंथालय परिचर आणि विशेष करून आरोग्य विभागात अभिलेखापाल या पदाकरीता रोजगाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे नवीन सुधारित सहा महिन्याचे ग्रंथपालन प्रशिक्षणाची निर्मिती केली आहे. सदर प्रशिक्षण हे जानेवारी 2027 ते जून 2027 या कालावधीमध्ये होणार असून या प्रशिक्षणाच्या प्रवेश करिता इयत्ता बारावी कोणत्याही शाखेतून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रवेशा करिता वयाची अट नाही. या प्रशिक्षणाचे माध्यम मराठी राहणार असून प्रशिक्षणाचे स्थळ : सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ, सोलापूर, हुतात्मा स्मारक मार्कंडेय उद्यान, अशोक चौक, पोलीस चौकी समोर, सोलापूर कार्यालय राहणार असून प्रशिक्षणाचे वर्ग दर शनिवारी आणि रविवारी या दोनच दिवशी राहणार आहेत. प्रशिक्षणाची प्रवेश प्रक्रिया दररोज सकाळी 10 ते दुपारी 5 या वेळात सुरू असून प्रवेशाचा अंतिम दिनांक 31 डिसेंबर 2026 पर्यंत असून प्रवेशा करिता कोणत्याही मूळ (ओरिजनल) शैक्षणिक प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. करिता जिल्ह्यातील सर्व ग्रंथप्रेमी नागरिक त्याचप्रमाणे शाळा, कॉलेजचे विद्यार्थी, कर्मचारी, स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी सुशिक्षित बेरोजगार युवक, युवती यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. हा अभ्यासक्रम डी. एड समकक्ष आहे. प्रवेशाकरिता इयत्ता बारावीची गुणपत्रिका झेरॉक्स, शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स, जातीच्या प्रमाणपत्राची झेरॉक्स आणि आधार कार्डची झेरॉक्स त्याचप्रमाणे चार पासपोर्ट साईज फोटो इत्यादी आवश्यक राहणार आहेत प्रशिक्षणाच्या प्रवेशा करिता अधिक माहितीसाठी 9404666488 / 7350922276 / 8308178551 या भ्रमणध्वनीवर संपर्क करू शकता, असे आवाहन सोलापूर केंद्राचे वर्गव्यवस्थापक ग्रंथमित्र कुंडलिक मोरे यांनी केले आहे.

बार्शी-अगळगाव रोडवर जनावरांची क्रूरतेने वाहतूक

पाच जणांविरुद्ध कारवाई

बार्शी (कटूसत्य वृत्त):- बार्शी शहरातील बार्शी-अगळगाव रोडवरील गोशाळेजवळ जनावरांची कथित क्रूरतेने वाहतूक होत असल्याचा प्रकार पोलिसांच्या निदर्शनास आला. बोलेरो मॅक्स पिकअप वाहनातून सात जनावरांची दाटीवाटीने वाहतूक केली जात असल्याच्या आरोपावरून वाहनातील पाच जणांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली. या कारवाईत वाहन व जनावरांसह एकूण ३ लाख ८४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतल्याचे पोलिसांच्या फिर्यादीत नमूद आहे. दिनांक २२ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे २ वाजण्याच्या सुमारास बार्शी शहर पोलीस ठाण्यातील कर्मचारी नाईट राउंड गस्त घालत असताना बार्शी-अगळगाव रोडवरील गोशाळेजवळ जनावरे भरून जाणारे वाहन काही गोरक्षकांनी अडविल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. तेथे बोलेरो मॅक्स पिकअप (एमएच ४७ एएस ८६५०) आढळून आली.

वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये चार रेडे, एक रेडी व दोन देशी खिलार जातीच्या गायी अशी एकूण सात जनावरे असल्याचे दिसून आले. जनावरांना कमी जागेत दाटीवाटीने बांधण्यात आले होते, त्यांना हालचाल करता येणार नाही अशा स्थितीत मुसक्या आवळून बांधले होते, तसेच चारा, पाणी व औषधांची व्यवस्था नसल्याचे पोलिसांच्या फिर्यादीत नमूद आहे. जनावरांना वेदना होतील अशा पद्धतीने वाहतूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणात बोलेरो मॅक्स पिकअप वाहनाची किंमत ३ लाख रुपये, चार रेड्यांची किंमत ५४ हजार रुपये, एका रेडीची किंमत ५ हजार रुपये आणि दोन खिलार गायींची किंमत २५ हजार रुपये, असा एकूण ३ लाख ८४ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

वाहनातील विवेक राजेंद्र काटकर, नितीन सुभाष केंदल, संग्राम मनोज होलीये, कुलदीप रत्नलालजी गवळी व चालक गणेश सचिन नामदे यांच्याविरुद्ध जनावरांची क्रूरतेने वाहतूक केल्याच्या आरोपावरून कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास व कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

जाहीर प्रसिध्दीकरण क्रि. कि. अर्ज नं. २४७/२०२६

मोहोळ येथील मे.ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट वर्ग-१ सो, यांचे कोर्टात

सिंधुबाई अण्णा खवळे, (लग्नाअगोदरचे नांव) सिंधुबाई महादेव जाधव,(लग्नानंतरचे नांव) वय- ७७वर्षे, धंदा- घरकाम, मु. ढोराळे,पो. इर्ले, ता.बार्शी, जि. सोलापूर. } अर्जदार

विरूद्ध

ग्रामपंचायत बिटले, ता. मोहोळ, जि. सोलापूर (अर्जाची नोटीस ग्रामसेवक बिटले,ता.मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमूद अर्जदार सिंधुबाई अण्णा खवळे, हिचा जन्म ता.०१/०१/१९४९ रोजी अर्जदार यांची आई सगाबाई अण्णा खवळे, हिचे पोटी मार घरी मौजे बिटले, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा हिच्या जन्म दाखल्याची ता.०७/०९/२०२६ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील जानेवारी १९४९ चे अभिलेखात अर्जदार सिंधुबाई अण्णा खवळे, हिचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला.

त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदार यांच्या जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.९०/९२/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिद केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. २३/११/२०२६

कोर्टाचा शिक्का

सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, मोहोळ.

स्वामी भक्तांकरिता 38 वर्षापासून महाप्रसाद कार्य हे कौतुकास्पद- उषाताई कराड



अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष- जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष- अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून स्वामी भक्तांकरिता गेल्या 38 वर्षापासून महाप्रसाद कार्य सुरु आहे हे कौतुकास्पद असल्याचे मनोगत एम.आय.टी.चे कुलपती- विश्वनाथ कराड, पुणे -भारत यांच्या सुविद्य पत्नी - व एम.आय.टी.च्या संचालक उषाताई विश्वनाथ कराड यांनी व्यक्त केल्या. त्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष- अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी त्या बोलत होत्या. याप्रसंगी न्यासचे पुरोहित अप्पू पुजारी, दत्ता माने,अतिश पवार, शहाजी यादव, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, कल्याण देशमुख, महांतेश स्वामी, राहुल इंडे, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.

मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर

संपर्क - 9422602337, 8317212037

Classified - छोटी जाहीरात

बोअरवेल

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
सिक्युरिटी गार्ड
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वर-वधू



जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) आईची बहीण २) अंतराळातील अवकाशवाहन ३) पंधरा दुणे ४) देशपातळीवर काम केलेले महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते ५) शर्थ, नियम ६) नाकाने ओढावयाची तंबाखूची पूड ९) नगरपालिकेवर निवडून दिलेला लोकप्रतिनिधी १०) केंद्रीय मंत्री-नारायण ** १२) दुर्ग, किल्ला १३) शिवकालीन छुपी लढाईची पध्दत-गनिमी ** १४) सणादिवशी करतात तो गोड खाद्यपदार्थ १५) भिंतीवरील सरपटणारा प्राणीजीव १७) दह्यात पाणी मिसळून बनविलेले पेय १८) छोटी चारचाकी प्रवासी गाडी २०) एखाद्यास वश करण्याचे उपाय-** ** ** ** भेद २१) हनुमानाच्या उपासनेचा दिवस, एक म्हण-न कर्त्याचा वार **** २२) फलंदाजाच्या शंभर धावा २३) गन उलट लिहा २५) एखाद्या कामाचे घेतलेले व्रत २६) वरवर, वरल्या मनाने २८) भारतीय क्रिकेट टीमचे प्रशिक्षक-** शास्त्री ३०) तरचा जोडीदार ३२) एक म्हण-आपला ** जगन्नाथ, कर ३३) कागदी चलन ३४) एक म्हण-*** जीव सदाशिव ३५) देवांचा राजा ३६) गती, स्पीड ३७) बासरी ३८) तीन दुणे ३९) एक कडधान्य

आडवे शब्द : १) उत्तरप्रदेशमधील बहुजन समाजवादी पार्टीच्या अध्यक्षा ४) एक नेते-*** सिन्हा ५) राज ठाकरे यांच्या मुलाचे नाव ७) एक (इंग्रजीत) ८) उन्हाळा (इंग्रजीत) ९) कलाकार, बोल्टचा साथीदार ११) प्रवासाने होणारा त्रास १३) काकाचा बायको १४) राष्ट्रवादी अध्यक्ष शरद पवार यांचा जिल्हा १५) उडिदाच्या पिठापासून बनवितात तो रूचकर पदार्थ, लिज्जत कंपनीचे हे उत्पादन प्रसिध्द आहे १६) शनिवार नंतरचा दिवस १७) धातूचा तंतू १८) गोंधळ, गोंगाट १९) खंबीर, मजबूत २०) हळू, मंद गतीने २३) मीठ (हिंदीत) २४) आकाशाचा रंग २५) वेळी अवेळी मेघ गर्जनेसह पडणारा पाऊस २७) हनुमानाच्या हातातील शस्त्र २८) याच्यापासून शिरा बनवितात २९) परीट, धोबी ३१) एक महान संत ३३) सेवक, *** चाकर ३४) श्रीगणेशाचे एक नाव ३६) हॉटेलमधील सेवक ३७) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात-** ३८) सागर, रत्नाकर ४०) एक द्विदल कडधान्य ४१) स्वस्तच्या विरूध्दार्थी

सुडोकु - 107

	3		4	9			1	
7	4			1	8			
1	9	6	7				2	4
			5		1	7	6	2
		3		2	7		5	9
				4		3		
	7	8	9					
4	2	9					7	3
			3	7			9	8

आयुष्मान भारत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी रुग्णालयांनी सहभागी व्हावे- डॉ. ओमप्रकाश शेटे

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचा लाभ अधिकाधिक पात्र नागरिकांना मिळण्यासाठी जिल्ह्यातील शासकीय व खासगी रुग्णालयांनी योजनांमध्ये सहभागी होऊन प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. पात्र रुग्णांना योजनेंतर्गत मोफत उपचार उपलब्ध करून देण्यासाठी रुग्णालयांनी सकारात्मक भूमिका घ्यावी. सुरुवातीला समन्वयाने रुग्णालयांना योजनेत सहभागी करून घ्यावे आणि आवश्यकतेनुसार कायद्याच्या चौकटीत सक्तीची कार्यवाही करावी, असे निर्देश आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी दिले.

सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या अध्यक्षतेखाली योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात बैठक झाली. यावेळी जिल्ह्यातील योजनांची सद्यस्थिती, लाभार्थ्यांना मिळणाऱ्या उपचार सुविधा, रुग्णालयांचा सहभाग आणि योजनांची व्याप्ती वाढविण्याबाबत चर्चा करण्यात आली. महापालिका आयुक्तांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील रुग्णालयांची तातडीने बैठक घेऊन त्यांना योजनांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे.



प्रशासन आणि रुग्णालयांनी समन्वयाने काम करून पात्र लाभार्थ्यांना उपचारांचा लाभ मिळवून द्यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

धर्मादाय तसेच मोठ्या कॉर्पोरेट रुग्णालयांमध्ये गरीब व पात्र रुग्णांसाठी किमान २५ टक्के बेड राखीव ठेवणे बंधनकारक असून, या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे डॉ. शेटे यांनी स्पष्ट केले. योजनेंतर्गत उपचारांना मंजुरी मिळेपर्यंत रुग्णांकडून पैसे भरण्याची सक्ती करणे किंवा औषधे बाहेरून आणण्यास सांगणे, अशा तक्रारींचीही बैठकीत दखल घेण्यात आली.

याबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, २४ फेब्रुवारी २०२६ पासून नवीन 'टीएमएस २.०' पोर्टल सुरू झाले आहे. या प्रणालीमध्ये रुग्णालयाने उपचार मंजुरीसाठी अर्ज केल्यानंतर सहा तासांच्या आत मंजुरी देणे बंधनकारक आहे. निर्धारित वेळेत मंजुरी न मिळाल्यास प्रणालीद्वारे ती आपोआप मंजूर ग्राह्य धरली जाण्याची तरतूद आहे.

आपत्कालीन उपचारांसाठी ७२ तासांची सवलत असून, उपचारासाठी रुग्णाने आधी भरलेली रक्कम परत देणे रुग्णालयांना बंधनकारक असल्याची माहिती त्यांनी दिली.

आयुष्मान भारत योजनेअंतर्गत उपचारांचा लाभ घेणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत असून, नोव्हेंबरपर्यंतच्या आठ ते नऊ महिन्यांच्या कालावधीत ७७ हजार ४०२ रुग्णांनी 232 कोटी रुपयांच्या उपचारांचा लाभ घेतला आहे. राज्यभरात योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, सोलापूर जिल्ह्याची कामगिरी समाधानकारक असल्याचे डॉ. शेटे यांनी सांगितले.

योजनेतील उपचार पॅकेजेस आणि रुग्णालयांची संख्या वाढविण्यात आली आहे. पूर्वी २,३४६ उपचार पॅकेजेस आणि ४,५०० रुग्णालये होती. आता ही संख्या वाढवून ३,३९९ उपचार पॅकेजेस आणि ५,००० रुग्णालये करण्यात आली आहे. तसेच योजनेसाठी अर्थसंकल्पीय तरतूद ४५० कोटी रुपयांवरून ५,४०० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे अधिकाधिक पात्र नागरिकांना उपचारांचा लाभ मिळण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

योजनांची प्रभावी अंमलबजावणी, रुग्णालयांचा सक्रिय सहभाग, पात्र लाभार्थ्यांना वेळेत उपचार आणि उपचारादरम्यान आर्थिक अडचणी येऊ नयेत, यासाठी महानगरपालिका, आरोग्य विभाग व संबंधित रुग्णालयांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन करण्यात आले.

बैठकीस सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, आरोग्याधिकारी डॉ. राखी माने, योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. प्रवीण गुंजाळ, डीएमओ गणेश धुमाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पाडुळे, उपजिल्हाधिकारी (महसूल) लक्ष्मण कसेकर तसेच शहर व जिल्ह्यातील शासकीय आणि खासगी रुग्णालयांचे डॉक्टर व प्रतिनिधी उपस्थित होते.

शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. शरणकुमार लिंबाळेंची निवड

पुणे, (कटूसत्य वृत्त):- ज्येष्ठ साहित्यिक, कादंबरीकार, समीक्षक आणि संशोधक डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. २०२७ मध्ये पुण्यात होणाऱ्या या ऐतिहासिक साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना मिळणे हा त्यांच्या साहित्यिक प्रवासातील महत्त्वाचा सन्मान मानला जात आहे. 'अक्करमाशी' या गाजलेल्या आत्मकथनातून सामाजिक विषमता, जातिव्यवस्था आणि वंचित समाजाच्या जगण्यातील संघर्ष प्रभावीपणे मांडणारे लेखक म्हणून लिंबाळे यांची देशभर ओळख आहे.

१ जून १९५६ रोजी सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील हन्नूर येथे त्यांचा जन्म झाला. सामाजिक विषमता, अस्पृश्यता आणि जातिव्यवस्थेतील संघर्षाचे अनुभव त्यांच्या बालपणापासूनच त्यांच्या वाट्याला आले. याच अनुभवांनी त्यांच्या



साहित्याला दिशा आणि वैचारिक अधिष्ठान दिले. त्यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून इंग्रजी विषयात बी.ए., मराठी विषयात एम.ए. आणि 'मराठी दलित साहित्य आणि अमेरिकन ब्लॅक साहित्य : एक तुलनात्मक अभ्यास' या विषयावर पीएच.डी. संपादन केली.

त्यांच्या व्यावसायिक जीवनाची सुरुवात दूरसंचार विभागात टेलिफोन ऑपरेटर म्हणून झाली. त्यानंतर १९८६ ते १९९२ या काळात आकाशवाणीच्या सोलापूर केंद्रावर उद्घोषक म्हणून त्यांनी काम केले. पुढे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्रकाशन विभागात सहाय्यक संपादक, प्राध्यापक आणि संचालक अशा जबाबदाऱ्या सांभाळल्या. याच विद्यापीठातून ते निवृत्त झाले.

१९८४ मध्ये प्रकाशित झालेल्या 'अक्करमाशी' या आत्मकथनाने मराठी साहित्यविश्वात मोठी चर्चा घडवली. एका व्यक्तीच्या अनुभवांतून संपूर्ण वंचित समाजाचे वास्तव मांडणाऱ्या या पुस्तकाचे इंग्रजीत 'द आऊटकास्ट' या नावाने, तसेच हिंदीसह अनेक भारतीय भाषांमध्ये अनुवाद झाले. या पुस्तकामुळे मराठी दलित साहित्याला राष्ट्रीय स्तरावर व्यापक ओळख मिळाली.

लिंबाळे यांचे योगदान केवळ आत्मकथनापुरते मर्यादित नाही. 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र' या ग्रंथातून त्यांनी दलित साहित्याची स्वतंत्र वैचारिक आणि समीक्षात्मक मांडणी केली. साहित्याचे मूल्यमापन करताना सामाजिक वास्तव, अनुभवांची प्रामाणिकता, मानवी वेदना, संघर्ष आणि परिवर्तनाची जाणीव महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या साहित्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुतेच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो.

त्यांच्या साहित्याचे हिंदी, इंग्रजी, मल्याळम, तमिळ, कन्नड, गुजराती आणि पंजाबी अशा विविध भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. देशातील अनेक विद्यापीठांमध्ये त्यांच्या साहित्याचा अभ्यास आणि संशोधन केले जाते. प्रकाशकांच्या माहितीनुसार त्यांच्या नावावर ४६ प्रकाशित साहित्यकृती आहेत.

आत्मकथन, कादंबरी, कथा, कविता आणि साहित्यसमीक्षा अशा विविध साहित्यप्रकारांतून सामाजिक वास्तवाला प्रभावी अभिव्यक्ती देणाऱ्या डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी झालेली निवड ही त्यांच्या प्रदीर्घ साहित्यिक योगदानाची महत्त्वपूर्ण दखल मानली जात आहे.

नातेपुते पोलिसांच्या कार्यपद्धतीवर ग्रामस्थांचा संताप

राजकीय हस्तक्षेपातून खोटे गुन्हे दाखल होत असल्याचा आरोप

नातेपुते (कटूसत्य वृत्त):- नातेपुते पोलिस स्टेशनच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत नातेपुते व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी पोलिस प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. पोलिस स्टेशनमध्ये राजकीय हस्तक्षेप वाढला असून, काही प्रकरणांत चुकीची कलमे लावून गुन्हे दाखल केले जात असल्याचा, तर प्रत्यक्ष तक्रारींची दखल घेण्यास टाळाटाळ होत असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांमार्फत स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी शिवप्रसाद उद्योग समूहाचे शरद मोरे यांच्याकडून व ग्रामस्थांकडून निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी दिलेल्या निवेदनानुसार, २३ नोव्हेंबर २०२६ रोजी कृष्ण मोहन सावंत, अमोल लालासो सावंत, विशाल दत्तात्रय पवार आणि किर्दक कुटुंबीय यांच्यात किरकोळ वाद झाल्याची घटना घडली. हा प्रकार किरकोळ स्वरूपाचा असतानाही भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४ व ११९(१) अन्वये गुन्हे



दाखल करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित प्रकरणात राजकीय दबावातून कठोर कलमे लावण्यात आली असून, संबंधित व्यक्तींना विनाकारण अटक करून डांबून ठेवण्यात आल्याचा दावाही ग्रामस्थांनी केला आहे. या आरोपांची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, शिवप्रसाद दूध संघाच्या मशिनरीसंदर्भात मागील सहा महिन्यांपासून एका व्यक्तीने मशिनरी बेकायदेशीरपणे ताब्यात ठेवल्याची ऑनलाइन तसेच प्रत्यक्ष तक्रार करण्यात आली आहे. मात्र, या तक्रारीवर पोलिसांकडून अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकरणातही राजकीय हस्तक्षेप असल्याचा संशय ग्रामस्थांनी तसेच शरद मोरे यांनी व्यक्त केला आहे.

नातेपुते पोलिस स्टेशनच्या हद्दीत जोरे नावाच्या व्यक्तीवर वारंवार अन्याय होत असल्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष झाल्याने त्याला आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागल्याचा गंभीर उल्लेखही निवेदनात करण्यात आला आहे. या घटनेचीही सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. कायद्याची अंमलबजावणी करताना कोणताही राजकीय दबाव न घेता तक्रारींची सत्यता तपासून योग्य ती कायदेशीर कारवाई करणे अपेक्षित आहे. मात्र, एका बाजूला काही व्यक्तींविरुद्ध चुकीच्या कलमांखाली गुन्हे दाखल होत असल्याचा आरोप, तर दुसऱ्या बाजूला प्रत्यक्ष तक्रारींकडे दुर्लक्ष होत असल्याची परिस्थिती निर्माण झाली असल्याचे ग्रामस्थांचे व शरद मोरे यांचे म्हणणे आहे.

नातेपुते पोलिस स्टेशनच्या संपूर्ण कार्यपद्धतीची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. येत्या १५ दिवसांत योग्य कार्यवाही न झाल्यास समस्त ग्रामस्थांच्या वतीने नातेपुते पोलिस स्टेशनविरोधात कायद्याच्या चौकटीत राहून शांततेत आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही शरद मोरे व ग्रामस्थांकडून देण्यात आला आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, पोलीस अधीक्षक, सोलापूर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, अकलूज यांना पाठविण्यात आल्या आहेत. आता या गंभीर आरोपांवर पोलीस प्रशासन काय भूमिका घेते आणि वरिष्ठ अधिकारी या प्रकरणाची कितपत दखल घेतात, हे पाहणे गरजेचे आहे.

उजनी धरणावरील प्रस्तावित प्रकल्प रद्द होईपर्यंत मच्छीमारांनी मासेमारीचा परवाना काढू नये- उत्तरेश्वर कांबळे

करमाळा (कटूसत्य वृत्त):- उजनी धरणाच्या अस्तित्वावर आणि परिसरातील हजारो मच्छीमारांच्या उपजीविकेवर घाला घालणाऱ्या प्रस्तावित प्रकल्पांविरोधात आता संघर्ष अधिक तीव्र करण्याची वेळ आली आहे. जोपर्यंत उजनी धरणावरील प्रस्तावित प्रकल्प रद्द होत नाहीत, तोपर्यंत एकाही मच्छीमार बांधवाने मासेमारीचा परवाना काढू नये, असे आक्रमक आवाहन भीम आर्मीचे प्रदेशाध्यक्ष उत्तरेश्वर कांबळे यांनी केले आहे. उजनी धरणावर पिढ्यानपिढ्या मासेमारी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या



मच्छीमार बांधवांनी आता सावध होण्याची गरज आहे. मासेमारी करणाऱ्या लोकांची संख्या किती आहे, त्यांची उपजीविका किती मोठ्या प्रमाणावर या धरणावर अवलंबून आहे, याचा अभ्यास करून भविष्यात त्यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारे निर्बंध आणण्याचे किंवा त्यांचे अस्तित्व धोक्यात आणण्याचे षडयंत्र रचले जाऊ शकते, अशी भीती कांबळे यांनी व्यक्त केली. मच्छीमार बांधवांनो, आज गप्प बसलात तर उद्या आपल्या हातातील रोजगारही हिरावला जाऊ शकतो! त्यामुळे केवळ वैयक्तिक हिताचा विचार न करता सर्व मच्छीमारांनी एकत्र येऊन या प्रस्तावित प्रकल्पांना तीव्र विरोध करावा. उजनी धरण हे केवळ पाण्याचे स्रोत नसून लाखो नागरिकांच्या जीवनाचा आधार आहे. शेतकरी, मच्छीमार आणि स्थानिक नागरिकांच्या भविष्याशी खेळण्याचा अधिकार कोणालाही नाही. स्थानिक जनतेला विश्वासात न घेता कोणतेही प्रकल्प लादण्याचा प्रयत्न झाल्यास तो खपवून घेतला जाणार नाही. प्रकल्प रद्द झाल्याशिवाय माघार नाही, मच्छीमारांच्या रोजगारावर घाला घालू देणार नाही! असा ठाम निर्धार व्यक्त करत उत्तरेश्वर कांबळे यांनी उजनी धरण परिसरातील सर्व मच्छीमार बांधवांना एकजुटीने या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

हिरव्या उसापासून दर्जेदार 'मुरघास' तयार करा जनावरांच्या पोषणासाठी चारा टंचाईवर मात करा

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- सध्या जिल्ह्यात ऊस तोडणी आणि गाळप हंगाम सुरू असून, ऊस तोडणीनंतर शेतात मोठ्या प्रमाणात हिरवे ऊस वाडे उपलब्ध होतात. अनेकदा हे वाडे वाया जातात किंवा जाळून टाकले जातात. मात्र, या हिरव्या ऊस व उसाच्या वाड्यांवर योग्य प्रक्रिया करून त्यापासून उत्कृष्ट प्रतीचा 'मुरघास' (सायलेज) तयार केल्यास उन्हाळ्यात उद्भवणाऱ्या चारा टंचाईवर सहज मात करता येऊ शकते. त्यामुळे जिल्ह्यातील पशुपालक आणि शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त प्रमाणात ऊस वाड्यापासून मुरघास तयार करून त्याचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

मुरघास तयार करण्याचे फायदे : हिरवा ऊस व उसाच्या वाड्यातील सर्व पोषक घटक मुरघासमध्ये टिकून राहतात. त्यामुळे दुधाळ जनावरांच्या दूध उत्पादनात आणि फॅटमध्ये चांगली वाढ होण्यास मदत होते. उन्हाळ्यात हिरव्या चाऱ्याची तीव्र टंचाई असताना मुरघास जनावरांसाठी अत्यंत उपयुक्त ठरतो. तसेच, चारा टंचाईच्या काळात महागडा चारा विकत घेण्याचा खर्च कमी होतो आणि ऊस वाड्याचा योग्य वापर होतो. मुरघास तयार करून त्याची साठवण केल्यास वर्षभर चांगला चारा उपलब्ध राहू शकतो.

मुरघास कसा तयार करावा? हिरवे ऊस व ऊस वाडे कुट्टी यंत्राच्या (ट्रॅक्टर संचालित कडबा कुट्टी मशीन) साहाय्याने बारीक करून घ्यावेत. त्यानंतर कुट्टी मिक्सिंग करण्यासाठी पाणी सहज जाणार नाही अशा ठिकाणी जमिनीवर ३ ते ४ फूट उंच वडग्यासारखा आकार देऊन मुरघास तयार करण्यासाठी जागा निश्चित करावी. खड्डा तयार करण्यासाठी ट्रॅक्टर किंवा ट्रॅक्टरच्या साहाय्याने कुट्टी भराव्यास मदत होते. कुट्टी भरल्यानंतर त्यामध्ये ५०० मायक्रॉनची प्लास्टिक शीट अंथरून घ्यावी. त्यावर कुट्टीचा थर टाकून पायाने किंवा ट्रॅक्टरच्या साहाय्याने दाबून हवा बाहेर काढावी. कुट्टीचा आकार निमुळता ठेवावा. त्यानंतर वरून कुट्टी चांगल्या पद्धतीने झाकून घ्यावी.

कुट्टीच्या ढिगावर साधारण दोन फूट मातीचा थर लावून ढिगाची असावी तशी ताडपत्रीवर उचकटून ठेवू नये.

कुट्टी तयार करताना हवाबंद पद्धतीने साठवण करणे महत्त्वाचे आहे. मुरघास तयार होण्यासाठी साधारण ४५ ते ६० दिवसांचा कालावधी लागतो. त्यानंतर हा मुरघास जनावरांना खाऊ घालण्यासाठी तयार होतो.

शेतकऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा अवलंब करून आपल्या दुग्धव्यवसायाला अधिक फायदेशीर बनवावे. अधिक माहिती व तांत्रिक मार्गदर्शनासाठी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी किंवा तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

मतदारांनी घाबरायचं नाही - खा धैर्यशील मोहिते पाटील

अकलूज (कटूसत्य वृत्त):- विरोधकांकडून मतदारांना भीती दाखवण्याचं काम केलं जात आहे. स्वतःच्या मतदारावर विश्वास दाखवले जात नाहीत. मतदारांनी घाबरायचं नाही, मत कोणाला केलं हे समजणार नाही. जिल्ह्यातील मतदाराने मनमोकळेपणाने, सद्सद्विवेक बुद्धीने मतदान करावं असे आव्हान स्वाभिमानी शेतकरी पॅनल प्रमुख खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले.

माजी आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या,सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या, निवडणूक पार्श्वभूमीवर शिवरत्न बंगला अकलूज येथे, माजी आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये, पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील बोलत होते.

पुढे बोलताना खासदार धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले की सोलापूर जिल्ह्यातील सहकाराचे जाळे, जिल्ह्यातील नेते मंडळींनी उभा केले, परंतु कोणतरी व्यक्ती मतदारांना दम



राजन पाटील हे ज्येष्ठ नेते आहेत. त्यांचा मोठा अनुभव आहे. त्यांनी कोणाचेही नाव घेतलेले नाही. नाव जोडले गेले आहेत.त्यांनी कोणताही कार्यकाळ सांगितलेला नाही. त्यांचा दीर्घ अनुभव आहे. त्यांचे विधान दुर्लक्षित करता येणार नाही. नंतर आपण त्यांच्याकडून माहिती घेऊ, खोलपर्यंत जावो असे माजी आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील म्हणाले.

देतोय, मतदाराने घाबरू नये, मनमोकळ्यापणाने मतदान करावे, कोणाला मतदान केलं हे समजत नाही आणि समजत असेल तर सहकार निवडणूक आयुक्ताने गांभीर्याने याची दखल घ्यावी.2014 पासून तेच आरोप आमच्यावर केले जातात. अख्या महाराष्ट्राला माहित आहे, चोर कोण आहे ते, आम्ही लढत देतोय, लढत राहो, सोलापूर जिल्ह्याचा स्वाभिमान टिकवण्यासाठी असे म्हणून त्यांनी आमच्या पॅनलचे उमेदवार दणदणीत आहेत. आम्ही दिलेले उमेदवार अभ्यासू उमेदवार आहेत.

अभ्यासपूर्ण भाषण करतात. कामकाजात भाग घेणारी माणसं आमचे उमेदवार आहेत असे म्हणून आमच्या सगळ्याच्या सगळ्या जागा येतील असा त्यांनी विश्वास व्यक्त केला.

गुरुनानक देव यांची शिकवण आचरणात आणावी- डॉ नारायण बनसोडे



अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- माणुसकीने वागावे, सर्व धर्मांचा आदर करावा, कष्टाला प्रतिष्ठा द्यावी समाजातील दुर्बल घटकांना मदत करावी, ही गुरुनानक यांची शिकवण आचरणात आणावी असे प्रतिपादन संतोष भीमराव पाटील महाविद्यालय मंद्रूप येथील प्राध्यापक व मनपा नगरसेवक डॉ नारायण बनसोडे यांनी व्यक्त केली. महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इतिहास विभागाने शिखांचे धर्मगुरु गुरुनानक देव यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित केला होता, त्यावेळी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. यावेळी मंचावर प्राचार्य डॉक्टर राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, गुरुनानक यांनी समाजातील जातिभेद, धर्मभेद, अंधश्रद्धा, उच्च नीचतेची भावना आणि सामाजिक विषमतेला विरोध केला, ईश्वर एक आहे सर्व मानव समान आहेत कर्मकांडापेक्षा सदाचार, प्रामाणिकपणा आणि निस्वार्थी सेवा महत्त्वाची आहे अशी शिकवण दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन प्राध्यापिका डॉक्टर शितल झिंगाडे भस्मे यांनी केले कार्यक्रमाचा उद्देश प्राध्यापक सौरभ भस्मे यांनी विशद केला तर आभार इतिहास विभाग प्रमुख प्रा मधुबाला लोणारी यांनी मानले कार्यक्रमास प्राध्यापिका सौंदर्या शास्त्री, ऐश्वर्या तारापुरे उपस्थित होते.

गुरुद्वारामधील उपक्रम प्रेरणादायी

शिखांचे पहिले धर्मगुरू गुरुनानक यांनी मानवता, विश्वबंधुत्व, समता आणि सामाजिक एकतेचा संदेश दिला, नांदेड येथील गुरुद्वार प्रार्थना स्थळ पाहण्यास गेलो तर तेथील गुरुवाणीचे पठण, लंगर आणि सेवा कार्य पाहून प्रभावित झालो गुरुद्वारा मधील स्वच्छता अन्नदान आदी समाजपयोगी उपक्रम प्रेरणादायी आहेत असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

अकलूजची अभिनेत्री प्रणाली घोगरे 'गणा धाव रे' चित्रपटात

अकलूज (विलास गायकवाड):- 'बाईपण भारी देवा' या चित्रपटाच्या यशानंतर, केदार शिंदें यांच्या 'गणा धाव रे' या चित्रपटामध्ये अकलूजची प्रणाली घोगरे मुख्य भूमिकेत दिसणार आहे.

स्त्रियांच्या नातेसंबंधांवर आणि भावविश्वावर आधारित 'बाईपण भारी देवा' या चित्रपटातून मोठे यश मिळवणारे दिग्दर्शक केदार शिंदे आता 'गणा धाव रे' ही नवी कथा घेऊन येत आहेत. विषय बदलला असला, तरी याही चित्रपटात एका तरुणीच्या जिद्दीला कथानकात विशेष महत्त्व आहे. ही गौरी' ची भूमिका अकलूजची अभिनेत्री प्रणाली घोगरे साकारत आहे.

'बाईपण भारी देवा' मध्ये सहा बहिणींच्या नात्यांमधून केदार शिंदे यांनी कौटुंबिक भावनांचा वेगळा पट उलगडला होता. 'गणा धाव रे' मध्ये मात्र कोकणातील एका गावाची आणि गणेशमूर्ती घडवणाऱ्या कुटुंबाची कथा आहे. वडिलांवर आलेले संकट दूर करण्यासाठी पुढे येणाऱ्या गौरीची व्यक्तिरेखा या चित्रपटाचा महत्त्वाचा भाग आहे. परंपरेने जपलेल्या कलेची जबाबदारी स्वीकारताना तिच्यासमोर येणारे प्रश्न आणि



त्यातून उभा राहणारा संघर्ष ट्रेलरमध्ये दिसतो.

या चित्रपटात भरत जाधव यांची महत्त्वाची भूमिका असून, त्यांच्या जोडीला भार्गवी चिरमुले आणि सुलभा आर्या यांसारखे अनुभवी कलाकार आहेत. 'जत्रा', 'अगं बाई अरेच्चा!' यांसारख्या चित्रपटांमुळे परिचित असलेल्या केदार शिंदेंच्या दिग्दर्शनाखाली प्रणालीला काम करण्याची संधी मिळाली आहे.

हिंदी दूरचित्रवाणी मालिकांमधून अभिनयाची सुरुवात करून विविध चित्रपटांत काम केलेल्या प्रणालीसाठी 'गौरी' ही मोठी जबाबदारी असलेली भूमिका आहे. अकलूजशी नाते असलेल्या या अभिनेत्रीचा नवा चित्रपट २७ नोव्हेंबरला प्रदर्शित होत आहे.